ePaper
वर्ष - 7 । अंक -36 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | ।शुक्रवार, दि. 2 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## राहुल गांधी 'विदूषक', गिरीराज सिंह यांची टीका



### आतील पानांत

- पुणे जिल्ह्यात 'शासन आपल्या दारी'अभियान!
- महापालिकेच्या शाळांमध्ये भरणार २०९ जागा, शिक्षक भरतीसाठी गर्दी!

# शिरूर लोकसभेसाठी राष्ट्रवादीत रस्सीखेच!

## 2024 ची शिरूर लोकसभा लढणार आणि जिंकणार: विलास लांडे

### अमोल कोल्हेंना राष्ट्रवादीतूनच विरोध?

### वळसे पाटील यांची चर्चा असतांना आता विलास लांडे यांचे भावी खासदार म्हणून लागले फ्लेक्स

### अमोल कोल्हेंनी पहिल्यांदाच मांडली भूमिका

पान 5 वर



।पिंपरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांचे शिरूर लोकसभा मतदारसंघात भावी खासदार म्हणून फ्लेक्स लागले आहेत. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि अजित पवार यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जाणारे भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांचे शिरूर लोकसभा मतदारसंघात भावी खासदार म्हणून फ्लेक्स लागले आहेत. माजी आमदार विलास लांडे यांचा 1 जून रोजी वाढदिवस असून त्यानिमित्ताने भावी खासदार असा उल्लेख असलेले फ्लेक्स भोसरीमध्ये लावण्यात आले आहेत. २०१९ मध्ये शिरूर लोकसभेसाठी विलास लांडे हे तीव्र इच्छुक होते. पण, ऐन वेळी आयात केलेले खासदार अमोल कोल्हे यांना राष्ट्रवादीकडून उमेदवारी मिळाली होती. त्या वेळी कोल्हे यांनी शिवाजी आढळराव पाटील यांचा दारुण पराभव केला होता.**




राष्ट्रवादीचे माजी आमदार विलास लांडे यांनी खासदारकीसाठी शड्डू ठोकल्याचे बोलले जात आहे. आज त्यांचा वाढदिवस असून यानिमित्ताने त्यांच्या कार्यकर्त्यांनी भोसरीमध्ये भावी खासदार म्हणून फ्लेक्सबाजी केली आहे. विलास लांडे हे राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि अजित पवार यांचे निकटवर्तीय मानले जातात. परंतु, २०१९ ला शिरूर लोकसभेसाठी राष्ट्रवादीने अमोल कोल्हे यांची निवड करीत खासदारकीची उमेदवारी दिली होती. शिवसेनेला सोडचिठ्ठी देऊन अमोल कोल्हे यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला होता. आयात उमेदवारीवरून विलास लांडे समर्थकांनी नाराजी व्यक्त केली होती. आम्ही कोल्हे यांचा प्रचार करणार नाही, असे त्यांनी स्पष्ट बोलून दाखवले होते.

### भोसरीमध्ये भावी खासदार म्हणून लागले फलक

आगामी लोकसभा निवडणूक मी लढणार आणि ती जिंकणार असा ठाम विश्वास भोसरी विधानसभेचे माजी आमदार विलास लांडे यांनी व्यक्त केला आहे. ते पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. शिरूर लोकसभा मतदारसंघ असलेल्या भोसरीमध्ये माजी आमदार विलास लांडे यांचा भावी खासदार उल्लेख असलेले फलक लावण्यात आले आहेत. यावर आता विलास लांडे यांनी प्रतिक्रिया दिली असून विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांचे तोंड भरून कौतुक करत त्यांना टोला देखील लगावला आहे. "सर्वसामान्य कार्यकर्त्यांचीच मी शिरूर लोकसभा निवडणूक लढवावी अशी आग्रही भूमिका आहे. शेवटी पक्षश्रेष्ठी ठरवेल कोणाला उमेदवारी द्यायची. जो कोणी उमेदवार असेल त्याचं मी काम करेल. २०१९ पासूनच मी आगामी लोकसभेची तयारी करत होतो. आगामी लोकसभा निवडणुकीला अमोल कोल्हे हे शिरूर लोकसभा मतदारसंघातून उभे राहणार असतील तर त्यांना माझा विरोध नाही. खासदार म्हणून त्यांनी अनेक चांगली काम केलेले आहेत.

# पुणे जिल्ह्यात 'शासन आपल्या दारी' अभियान!

## नागरिकांना मिळाला सरकारी सेवा योजनांचा लाभ

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे जिल्ह्यात सरकारच्या विविध सेवा व योजनांचे अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील एक लाख ८१ हजार ३७६ नागरिकांना सरकारच्या विविध सेवा व योजनांचा लाभ मिळाला. विविध प्रकारच्या सरकारी सेवा योजनांचा लाभ सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी पुणे जिल्ह्यात मंगळवारी 'शासन आपल्या दारी' हे अभियान राबविण्यात आले. त्या अभियानांतर्गत एका दिवसात जिल्ह्यातील एक लाख ८१ हजार ३७६ नागरिकांना सरकारच्या विविध सेवा व योजनांचा लाभ मिळाला.**



या अभियानांतर्गत सुमारे ७५ हजार नागरिकांना योजनांचे लाभ देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. जिल्हाधिकारी डॉ. देशमुख आणि निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व उपविभागीय अधिकारी आणि तहसिलदारांनी शिबिराचे नियोजन केले होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी विविध सरकारी यंत्रणांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधून नागरिकांना सेवा देण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या दृष्टीने यंत्रणांनी विविध योजनांचा लाभ देण्यासाठी नागरिकांनाकडून अर्जही भरून घेतले.

काही ठिकाणी सभागृहात, तर काही ठिकाणी मंडप उभारून विविध यंत्रणांचा कक्ष स्थापन करण्यात आला होता. शिबिरात महसूल, कृषी, आरोग्य, जलसंपदा, पशुसंवर्धन, पंचायत समिती, निवडणूक शाखा, भूमी अभिलेख, सामाजिक वनीकरण आदी विभागांनी सहभाग घेतला होता.

> शिबिराच्या माध्यमातून नागरिकांचे कष्ट वाचले आणि त्यांना योजनांचा लाभ मिळाला याचे समाधान जास्त आहे. सर्व अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांनी चांगले प्रयत्न केले. यापुढेही अशाच मोहिमा राबवून सरकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला जाईल.
>
> - डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी

### हवेली, शिरूर, भोरमध्ये सर्वाधिक लाभ

| ठिकाण | लाभार्थी |
|---|---|
| पुणे शहर | १० हजार ९२९ |
| हवेली | २७ हजार ४१९ |
| मुळशी | 03 हजार ९५० |
| भोर | २८ हजार ४४२ |
| मावळ | तीन हजार ६८ |
| वेल्हे | आठ हजार ३९० |
| जुन्नर | तीन हजार ५२३ |
| खेड | १० हजार ८३७ |
| आंबेगाव | २४ हजार २०३ |
| शिरुर | ३३ हजार २२३ |
| बारामती | २१ हजार ४३१ |
| पुरंदर | पाच हजार ५१७ |

# विद्यार्थ्यांनी घेतले कौशल्य अन् उद्योजकतेचे धडे!

## भोसरीत छत्रपती शाहू महाराज युवा शक्ती करिअर शिबीर उत्साहात

### भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार

। पिंपरी । महाईन्यूज

**स्पर्धात्मक जीवनात विद्यार्थ्यांना करिअर आणि कौशल्य विकास याबाबत मार्गदर्शन ही काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी विविध संधीबाबत सर्वसमावेश माहिती ज्ञान करावी आणि यशस्वीपणे वाटचाल करावी, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केले.**



भोसरी येथे कै. अंकुशराव लांडगे सभागृहात कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या पुढाकाराने व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या सहकार्याने छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबीर आयोजित केले होते. या शिबिराला विद्यार्थी आणि शैक्षणिक संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

याप्रसंगी बोलताना आमदार महेश लांडगे यांनी या शिबिराच्या आयोजनामागचा शिंदे-फडणवीस सरकारचा उद्देश स्पष्ट केला. सरकारी योजना, उपक्रम सर्वसामान्य माणसांपर्यंत पोहोचण्यासाठी, विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन मिळण्यासाठी अशा शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.या कार्यक्रमास आयआयबी संस्थेचे महेश लोहारे, ॲड. निता लोहारे, वर्ल्डवाईड ऑईलफिल्ड मशिनचे मनुष्यबळ विभागप्रमुख शिवाजी चौंडकर यांनी औद्योगिक क्षेत्रातील करिअरच्या विविध संधी याबद्दल मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे प्राचार्य शशिकांत साबळे व डी.एन. गरदडे यांनी केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी निखील काळकुटे, ऋषभ खरात यांनी सक्रिय पुढाकार घेतला.

### युवकांना सुदृढ व सक्षम बनण्याचे आवाहन...

कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा. प्रदीप कदम यांनी करिअरची व्याख्या समजावून देताना, ज्या क्षेत्रात तुम्हाला तुमचे सर्वोच्च योगदान देता येईल, असे तुमच्या आवडीचे क्षेत्र निवडा व त्यात स्वतःची ओळख निर्माण करणे हेच करिअर... असा संदेश दिला. तसेच विद्यार्थ्यांना विविध सरकारी शिष्यवृत्ती, कर्ज योजना या विषयी कौशल्य विकासचे निवृत्त वरिष्ठ अधिकारी एच. आर. सूर्यवंशी

# महापालिकेच्या शाळांमध्ये भरणार 209 जागा

# शिक्षक भरतीसाठी गर्दी!

## शैक्षणिक वर्ष सुरू होण्याअगोदरच मानधन तत्त्वावर सहायक शिक्षकांची भरती सुरू

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या मराठी व उर्दू माध्यमांच्या शाळांत २०९ शिक्षकांची संख्या कमी आहे. परिणामी, शैक्षणिक वर्ष सुरू होण्याअगोदरच तात्पुरत्या स्वरूपात मानधन तत्त्वावर बीएस्सी, बीएड, बीए बीएड, बी. पी. एड. उत्तीर्ण परीक्षेतील सहायक शिक्षकांची भरती सुरू केली आहे. यासाठी गुरुवारी (ता. १) अर्ज मागविण्यात आले होते. २०९ जागांसाठी मोठ्या प्रमाणात अर्जदारांनी गर्दी केली होती. हजारोंच्या संख्येने अर्ज दाखल झाले आहेत.**



संत तुकारामनगरमधील दिनदयाळ माध्यमिक विद्यालयात सकाळी नऊ वाजता अर्जदार दाखल झाले होते. निवड होणाऱ्या शिक्षकांना २७ हजार ५०० रुपये मानधन देण्यात येणार आहे. सकाळी दहा वाजता अर्ज स्वीकृतीला सुरुवात झाली. सायंकाळी पाच वाजेपर्यंत अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे स्वीकारण्यात आली.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या माध्यमिक विभागाच्या मराठी आणि उर्दू माध्यमांच्या एकूण २९ शाळा आहेत. या शाळांमध्ये ९ हजार ८९३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी १२९ शिक्षक आहेत. मात्र, सध्या २०९ रिक्त जागा आहेत. शाळांमध्ये तब्बल २०९ शिक्षक संख्या कमी आहे. या शिक्षकांची संख्या कमी असल्याचे शिक्षण विभागाला माहिती असल्याने शैक्षणिक वर्ष सुरू होण्याअगोदरच त्वरित मानधनावर सहायक शिक्षकांची भरती करण्यासाठी महापालिकेने जाहिरात प्रसिद्ध केली.

माध्यमिक शिक्षण विभागामार्फत तात्पुरत्या स्वरूपात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी बी. एस्सी, बीएड, बीए बीएड, बी. पी. एड. उत्तीर्ण परीक्षेतील शिक्षकांच्या नेमणुका गुणवत्तेनुसार करण्यात येणार आहेत. उर्दू माध्यमाच्या सहायक शिक्षकांना महापालिकेच्या कोणत्याही उर्दू विद्यालयात कामकाज करावे लागेल. तसेच बी. ए. बी.एड. उर्दू शिक्षकांना सर्व विषयाचे अध्यापनाचे काम करावे लागेल, अशा सूचना अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केल्या.

मराठी माध्यमांमध्ये जवळजवळ १८४ पदे भरली जाणार आहेत आणि ही १८४ पदे एकत्रित मानधनावर भरली जाणार आहेत. तसेच उर्दू माध्यमांच्या २५ जागा भरण्यात येणार आहे. या कर्मचाऱ्यांना २७, ५००रुपये प्रति महिना एकत्रित मानधन दिले जाणार आहे.



### माध्यमिक शिक्षक जागा

| | |
|---|---|
| बी.एस्सी. बी.एड. (विज्ञान) | ३३ |
| बी.एस्सी. बी.एड. (गणित) | ३० |
| बी.ए. बी.एड. (मराठी) | ३२ |
| बी.ए. बी.एड. (हिंदी) | २२ |
| बी.ए. बी.एड. (इंग्रजी) | २५ |
| बी.ए. बी.एड. (इतिहास) | १० |
| बी.ए. बी.एड. (भूगोल) | १० |
| बी.पी.एड. (क्रीडा शिक्षक) | २२ |
| एकूण जागा | १८४ |



### उर्दू माध्यम

| | |
|---|---|
| बी.एस्सी. बी.एड. (उर्दू) | ९ |
| बी.ए. बी.एड. (उर्दू - भूगोल) | ७ |
| बी.ए. बी.एड. (इंग्रजी - इतिहास) | ९ |
| एकूण पदे | २५ |

# अनधिकृत होर्डिंगचा मोशी परिसराला विळखा!

## पाणी पुरवठा विभागाच्या निष्क्रिय कारभाराचा सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांच्याकडून जाहीर निषेध

। मोशी । महाईन्यूज

**मोशी उपनगरातील विविध भागात आधीच वाहतूक कोंडीचा प्रश्न आहे. त्यातच रस्त्यांवर अनधिकृत होर्डिंग्ज लागत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याचे चित्र आहे. नुकतेच किवळे रावेत येथे होर्डिंग पडून, काही नागरिकांना आपला जीव गमवावा लागल्याची घटना घडली. मात्र, या घटनेनंतरही अनधिकृत होर्डिंगचा पुन्हा एकदा सुळसुळाट सुरु झाल्याचे दिसून येत आहे.**



महापालिका या अनधिकृत होर्डिंगला कसा आळा घालणार, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. मोशी उपनगर जसजसं वाढत आहे, तसतसं बांधकाम व्यावसायिकासह अनेक व्यवसाय, विविध प्रसंगाच्या शुभेच्छा आदींच्या प्रसिद्धीसाठी पुणे नाशिक महामार्ग, देहू आळंदी बीआरटी मार्ग, राजा शिवछत्रपती चौक, भारत माता चौक आदी विविध चौकाचौकात बॅनरबाजी होत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. मोठमोठ्या होर्डिंग्सचा सांगाडा महामार्गाच्या सीमारेषेच्या आतापर्यंत येत असल्याचे आढळून आले आहे.


काही ठिकाणी या होर्डिंगमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होतो. मोशीमध्येही काही वर्षांपूर्वी एका अवाढव्य होर्डिंग कोसळून अपघात घडलेला आहे व किरकोळ अपघातांच्या घटनाही घडत असतात. यामुळे पिंपरी चिंचवड महापालिकेने होर्डिंग्सबाबत महत्त्वाचे पाऊल उचलून उपनगरातील अनधिकृत फलक हटविण्याची मागणी नागरिकांमधून जोर धरू लागली आहे.

# पिंपरी शहरात उद्या, परवा 'आप'ची स्वराज्य यात्रा

। पिंपरी । महाईन्यूज ।

आम आदमी पार्टीची स्वराज्य यात्रा २८ मे ते ६ जूनपर्यंत ८८३ किलोमीटरचा पल्ला पूर्ण करत आहे. महाराष्ट्राचे भक्तीस्थळ पंढरपूर ते शक्तीस्थळ किल्ले रायगड येथे यात्रेचा समारोप होणार असून, ३ व ४ जून रोजी ही यात्रा शहरातून जाणार आहे. या यात्रेत शहरातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्यात येणार आहे.

आपचे राष्ट्रीय संघटन सचिव संदीप पाठक आणि महाराष्ट्र राज्य सह-प्रभारी गोपाल इटालिया याच्या मार्गदर्शनाखाली आपच्या स्वराज्य यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. स्वराज्य यात्रेचा मुख्य उद्देश हा राज्यातील गावोगावी जाऊन जनतेच्या समस्या समजून त्यांना वाचा फोडणे आणि दिल्ली आणि




पंजाबच्या जनतेसारखं आम आदमी पार्टीला मतदान केल्यावर पक्ष महाराष्ट्र राज्यात काय बद्दल करू शकतो, हे पटवण्यासाठी पक्षाची पूर्ण कार्यकारिणी जमिनीवर काम करीत आहे.

**स्वराज्य** यात्रेच्या निमित्ताने आपने महाराष्ट्रामध्ये संघटन विस्ताराची मोहीम हाती घेतली आहे. रावेत येथे समारोप करून स्वराज्य यात्रा पुढे पनवेल मार्गे रायगडकडे मार्गस्थ होणार आहे, अशी माहिती स्वप्नील जेवळे व राज चाकणे यांनी पत्रकार परिषदेत दिली

# कुणी गाय मारली तर तुम्ही वासरू नका मारू




भारतावर दीर्घकाळ ज्यांनी राज्य केले त्या काँग्रेस पक्षाला आपणच तयार केलेला मजबूत वैचारिक पाया स्वतःहून उखडून टाकण्याची घाई झालेली आहे असे गेल्या काही वर्षातील घटनांवरून दिसून यायला लागले आहे. साधारणतः २०१४ नंतर म्हणजे मोदी सत्तेत आल्यापासून दोन्ही बाजूनी राजकारणाचा स्तर वेगाने खाली जाताना दिसत आहे याला केवळ भाजप किंवा मोदीच जबाबदार आहेत असे म्हणता येणार नाही, जरी भाजपकडे त्याचे अधिक दायित्व असले तरी काँग्रेसला निर्दोषी सोडता येण्यासारखी परिस्थिती नाही. राजा रस्त्यावर नागडा नाचायला लागला तर त्याचा विरोध करण्यासाठी विरोधकांनी अर्धनग्न होऊन रस्त्यावर येण्याची गरज नसते मात्र हे तारतम्य आपल्या देशात पाळले जाताना दिसत नाही. भाजप किंवा मोदी,शहा निर्विवाद बहुमत मिळाल्यावर ज्या पद्धतीने काम करीत आहेत ते काही आदर्श म्हणावे किंवा शंभर टक्के संविधानाला धरून आहे असे म्हणता येणार नाही.

एखादी विचारधारा मानणारा पक्ष सत्तेवर आला की त्या विचारणा पोषक असणाऱ्या योजना आणि तसाच विकास करायला सुरुवात करतो हे जगभर घडत आहे. काँग्रेसच्या दीर्घकाळच्या सत्तेत काय झाले हे शोधायला गेले तर अश्या असंख्य बाबी हाती सापडतील की ज्यांना संविधानाची मान्यता नव्हती मात्र त्या बाबी कायद्यात बसविण्यात आल्या किंवा खास बाब म्हणून तरी त्यांना मान्यता मिळावी आहे. दिवंगत इंदिराजी सत्तेत असताना त्यांचे चिरंजीव संजय गांधी प्रति प्रधानमंत्री बनून काय काय करीत होते तो काळ नजरेपुढून घातला तरी सत्तेचा फायदा अन गैरफायदा कसा घेतला जातो हे समजून यायला मदत होते. जे काँग्रेसवाले आज मोदी किंवा



भाजपच्या नावाने बोटे मोडतात त्यांनी अनिर्बंध सत्ता असताना काय केले हे शोधले तर सगळ्यांचे पाय मातीचेच असतात हे सत्य समजते. काँग्रेस मुस्लिमांच्या बाजूने कंबर तुटेपर्यंत तर भाजप हिंदूंच्या बाजूने झुकत आहे हाच काय तो फरक.

काँग्रेसच्या काळात अब्जावधी रुपयांचे प्रकल्प उभे झाले असताना लोकांना फारशी माहिती नसायची,प्रकल्पाच्या जागा ,कंत्राटदार आणि लाभार्थी फायनल करताना नेहरू किंवा इंदिराजी यांच्या पुढ्यात बोलण्याची कुणाचीही टाप नव्हती काँगेसचे बहुतांश प्रधानमंत्री एकखांबी तंबू होते ,निर्णय प्रक्रियेत कुणाला फारशी संधी नव्हती. आताही तसेच घडते आहे. मोदी,शहांच्या पुढे कुणाचीही बोलण्याची किंवा प्रश्न विचारण्याची हिंमत नाही ,ज्यांनी प्रयत्न केला त्यांचा नाना पटोले केला जातो. संघ परिवार लोकशाही अधिक समृद्ध करण्याची भाषा करीत असतो मात्र प्रत्यक्षात लोकशाहीचा श्वास कोंडण्याचे काम करीतच हे सरकार बेफाम सुटले आहे याबाबत कुणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. सत्तेच्या या अबलख घोडयाला वठणीवर आणायला हवे मात्र पुढे जाणाऱ्या हातात मजबूत लगाम असायला हवा. सध्यातरी काँग्रेस त्या क्षमतेची अजिबात वाटत नाही हे वास्तव आहे.

संख्या आणि नियोजनाच्या बळावर भाजपच्या चौखूर उधळलेल्या घोड्याला आपण लगाम घालू शकत नाही हे क्षात आल्यावर काँग्रेसने केवळ विरोधासाठी विरोध सुरु केला आहे. परवाच्या संसद भवनाच्या उदघाटनाला विरोध करून त्यावर बहिष्कार टाकून काँग्रेसने स्वतःचे हसे करून घेतले आहे. संसद देशाचा अभिमान आहे त्यामुळे हा अभिमान त्याच पद्धतीने व्यक्त व्हायला हवा होता मात्र तसे झाले नाही. मोदींनी राष्ट्रपतींच्या हस्ते उदघाटन का केले नाही हा मुद्दा फारसा महत्वाचा नाही. खुद्द राष्ट्रपतींना त्याबाबत काही तक्रार नसेल तर विरोधी पक्षांनी अरण्यरुदन करून काय उपयोग होणार आहे ? कुणाला उदघाटनाची बोलवावे ? कोणते विधी करावेत हे आजवर जर सत्ताधारी ठरवत आले असतील तर मोदी त्याला अपवाद कसे ठरतील ? याचे उत्तर कुणाकडे नसते. ज्या सेंगोलचा विरोधक एवढा बाऊ करतात तोच राजदंड नेहरूंनी पण कुण्यातरी पुरोहिताकडून विधिवत स्वीकारला होता ना मग कशाला एवढा गहजब ? विरोध करताना आपण नेमका कशाला करतो आहोत याचा विसर काँग्रेसला पडला आहे. भाजपने चुका करीत गाय मारली असेल तर काँग्रेस त्याच्या विरोधासाठी वासरू मारण्याचे पातक करीत आहे त्यामुळे काँग्रेसचा हिंदुविरोधी चेहरा अधिक प्रकाशमान होत आहे हे काँग्रेसच्या लक्षात येत नाही, भाजपला हेच हवे आहे. मोदींनी गोळा केलेल्या साधूंचा विरोध काँग्रेसने जोरदारपणे करावा असे भाजपला वाटत होते नेमके तसेच घडत आहे.

भाजप किंवा मोदी करीत असलेल्या कोणत्याही धार्मिक कृतींना काँग्रेस सतत विरोध करीत आहे हे आता भाजपला सांगण्याची गरज उरली नाही. आपणकसे हिंदुविरोधी आहोत हे दाखविण्याची या पक्षाला प्रचंड घाई झाल्याचे जाणवत आहे आणि हेच भाजपला अपेक्षित आहे. काँग्रेसने स्वतःहून हिंदू आणि हिंदुत्व हे विषय भाजपला आंदण देऊन टाकले आहेत. त्याचा फटका निवडणुकीत काँग्रेसला बसणार आहे हे सांगण्याची गरज आहे का ?

## संपादकीय »

### शेती आणि नॅनो तंत्रज्ञान

***'दैव माझ्यावरही प्रसन्न होते; पण देवाने आज त्याच्या झोळीत जास्त टाकले,' ही हार्दिक पंड्याची अंतिम सामन्यानंतरची प्रतिक्रियाच 'इंडियन प्रीमियर लीग'च्या (आयपीएल) सरत्या मोसमात काय घडले ते सांगण्यास पुरेशी आहे. हार्दिकचे हे उद्गार महेंद्रसिंह धोनीबाबत होते.***

'संशोधक नवनवीन तंत्रज्ञान विकसित करीत असतात. माझ्या मताने त्या संशोधनाचे व्यापारीकरण लगेच होते. सध्याची चलती नाणी म्हणजे विषाणू मारणारे, व्हिटॅमिनयुक्त आणि इम्युनिटी. ही जेवणापासून हात धुण्यापर्यंत प्रत्येक गोष्टींत भरभरून असतात; पण हा झाला मार्केटिंगचा भाग. संशोधक प्रत्येक तंत्रज्ञानाचा बादरायण संबंध संशोधनाला जोडतात, तेव्हा सामान्य माणसाच्या मनात संशोधनाविषयी शंका उत्पन्न होते. त्यातील एक चलनी नाणे म्हणजे नॅनो तंत्रज्ञान. उदाहरणार्थ, शेतीत रासायनिक खतांमध्ये नॅनो कणांचा वापर करून, नॅनो खते तयार केल्यास खतांची मात्रा कमी लागेल, असा दावा काही संशोधक करतात. हे शक्य आहे का? नॅनो तंत्रज्ञान उपयोगी आहे; पण त्याचा योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात उपयोग हवा.

**सोशल मीडिया केवळ आपल्या देशातच नव्हे तर जगभर लोकप्रिय आहे. एका पाहणीनुसार भारतात सुमारे पन्नास कोटी लोक व्हाट्स ऍप वापरतात. फेसबुक ३३ तर इंस्टाग्राम हे ऍप वापरणाऱ्या लोकांची संख्या २३ कोटींवर पोहोचली असून त्यात सतत वाढ होताना दिसत आहे. सौशल मीडियाची इतरही अंगे कार्यरत असून त्याचा वापर सुद्धा कोट्यवधी लोक करीत आहेत. यात व्हाट्स ऍप सर्वात जास्त वापरले जाते कारण ते हाताळायला सोपे असून आता त्यावर पैसेही पाठविण्याची सुविधा झाल्याने लाखो लोक त्या सेवेचाही वापर करताना दिसतात. यातील संदेश वहन सेवेचा सर्वाधिक लाभ लोक घेताना दिसतात.**

## मेंदू काढून घेणारी नवी समाज माध्यमे !

दररोज किमान १ हजार कोटी संदेश यावरून पाठवले आणि स्वीकारले जातात यावरून त्याचा वापर आणि प्रसार लक्षात येतो. सध्या भारतात व्हाट्स ऍप,फेसबुक आणि इंस्टाग्राम हे तीन ऍप सर्वाधिक लोकप्रिय असून तरुण वर्गाने फेसबुक कडे पाठ फिरवून आता इंस्टाग्राम जवळ केले आहे.

या समाज माध्यमांचा विविधांगी वापर होत असला आणि सर्वांच्या ते सोयीचे असले तरी त्यावर येणाऱ्या कोणत्याही मजकुराची सत्य,असत्याची कोणतीही खात्री मात्र कुणीही देऊ शकत नाही हे वास्तव आहे. तात्काळ अफवा अथवा भीती किंवा प्रलोभने देण्याचे प्रभावी माध्यम म्हणून या माध्यमांचा वापर होत असल्यामुळे कोणत्याही संवेदनशील प्रसंगात सर्वात आधी इंटरनेट बंद करावे लागते म्हणजे या माध्यमांचा गैरवापर रोखला जाऊ शकेल अशी उपाययोजना सरकार करीत असते यावरून ही माध्यमे दुधारी तलवार असल्याचे लक्षात येते. ज्यांच्या हातात ऍन्ड्रॉईड मोबाईल आला तो या माध्यमांचा वापर केल्याशिवाय राहत नाही त्यामुळे आलेला प्रत्येक मजकूर खरा की खोटा हे तपासून बघण्याचा कुणाकडेही वेळ नाही त्यामुळे आलेला संदेश कुणालातरी पाठवून देण्याची स्पर्धा सुरु असते. आपल्याला आलेला संदेश खरा की खोटा हे न तपासताच पुढे पाठवला जातो.

ज्यांना ही माध्यमे प्रभावीपणे हाताळून त्याची उपयोगिता



चांगली कळते अशांची संख्या अतिशय कमी असते आणि असे लोक कुणाच्यासाठी तरी ही माध्यमे हाताळण्याचे काम करताना दिसतात. चाळीसपैसे म्हणून ज्यांना चिडवले जाते तो हाच वर्ग असतो. एका पोस्ट साठी ठराविक रक्कम कुणीतरी याना देत असतो. लोकांमध्ये विशिष्ट विचारांचा प्रसार किंवा भ्रम निर्माण करून पसरविण्याचे कंत्राट घेणाऱ्या हजारो कंपन्या या क्षेत्रात उभ्या राहिल्या आहेत. सोशल मीडिया सेवा देणाऱ्या अश्या कंपन्या इमेज बिल्डिंग पासून तर विविध निवडणूक कॅम्पेन मोबदला घेऊन करताना दिसतात. काही समूह मुद्दाम धार्मिक किंवा विचारांची तेढ निर्माण करून राजकीय फायदे घेण्यासाठी या क्षेत्रात प्रशिक्षित केले जातात आणि सामान्य मोबाइलधारक त्याला सहज बळी पडत असतात. आपण सर्वात आधी एखादा मजकूर पाठवून जणू स्पर्धाच जिंकतोय या अविर्भावात चुकीचे संदेश पाठवले जातात.

नव्या संसद भवनाच्या निमित्याने सोशल मीडियावर पडणारा मजकूर सामान्य लोकांच्या डोक्यात संभ्रम निर्माण करणारा आहे यात सत्ताधारी आणि विरोधक दोघेही आघाडीवर दिसतात. मोदींनी केवळ हिंदू साधूनाच निमंत्रित केल्याचा गवगवा झाल्यावर आता मुस्लिम मौलवी,बौद्ध भंते आणि शीख धर्मगुरू यांच्या कडूनही काही विधी करून घेतल्याचे व्हिडिओ बाहेर आल्यावर अनेकांची दातखीळ बसल्याचे लक्षात येते.

## ।। अभंगवाणी ।।



अड्काल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोंविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# वस्त्रोद्योग कर्मचाऱ्यांची वाताहत!

## आठ महिने पगाराविना: मुंबईतील 8 तर राज्यातील 12 हजार कर्मचाऱ्यांचा समावेश

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**देशभरातील वस्त्रोद्योग कर्मचारी आठ महिने पगाराविना आहेत. याकडे केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री, सचिवांकडून अक्षम्य दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळांतर्गत (एनटीसी) कार्य करणाऱ्या या कर्मचाऱ्यांची वाताहत होत आहे. यामध्ये मुंबईतील आठ तर राज्यातील १२ हजार कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. देशभरातील वस्त्रोद्योग कर्मचाऱ्यांची वाताहत होत आहे. गेल्या ८ महिन्यांपासून हे कर्मचारी पगाराविना आहेत. यामध्ये मुंबईतील आठ तर राज्यातील १२ हजार कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.**




'एनटीसीतील कर्मचाऱ्यांना मागीलवर्षी चार-चार महिन्यानंतर वेतन मिळत होते. आता तर ऑक्टोबरपासून वेतनच मिळालेले नाही. देशभरातील एनटीसी कर्मचाऱ्यांची ही स्थिती आहे. अशाने कुटुंबांच्या पालनपोषणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. पगारासाठी सर्व प्रकारे उच्च स्तरावर विषय मांडला. परंतु, उपयोग झालेला नाही. त्यामुळे आता कर्मचारी आत्महत्येकडे वळण्याच्या विचारात आहेत. सरकार व प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे', अशी कळकळीची विनंती 'एनटीसी एम्प्लॉईज वेल्फेअर फोरम'ने केली आहे. एनटीसीचे देशभरात जवळपास २५ हजार कर्मचारी आहेत. मुंबईतील १३ गिरण्यांमध्ये आठ हजार व मुंबईबाहेर उर्वरित गिरण्यांमध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांचा आकडा १२ हजार आहे. मुंबई व राज्यातील सर्व गिरण्या करोनाआधी सुरू होत्या. करोनाचे कारण समोर करीत त्या बंद करण्यात आल्या असून, आता पगारही दिला जात नाही. याबद्दल या सर्व कर्मचाऱ्यांनी गुरुवारी देशव्यापी आंदोलन केले. सर्व गिरण्यांसमोर हे आंदोलन करण्यात आले.

दरम्यान, वस्त्रोद्योग मंत्रालयानेच सन २०२१मध्येच पत्र मुंबईच्या व्यवस्थापनाला लिहिले होते. 'एनटीसी बंद करण्यासाठी केंद्र सरकारने सार्वजनिक उद्योग विभागाला (डीपीई) १९ जानेवारी २०२२ रोजीच प्रक्रिया सुरू करण्यास सांगितले आहे. त्यादृष्टीने मागील दोन वर्षांचा ताळेबंद तत्काळ मंत्रालयाकडे पाठवावा. डीपीई या ताळेबंदाचा अभ्यास करून एनटीसी बंद करण्याची पुढील प्रक्रिया सुरू करेल', असे या पत्रात नमूद होते. अशाप्रकारे एनटीसी बंद करण्याचा घाट उच्चस्तरावरून आखण्यात आला आहे.

त्यासाठीच कर्मचाऱ्यांना वेळेत वेतन दिले जात नाही. जेणेकरून कर्मचाऱ्यांनी नोकरी सोडून इतरत्र जावे व सरकारचा भार हलका होईल, अशा विचाराने सरकार व प्रशासन वर्तन करीत असल्याचे एनटीसीतील कर्मचारी आंदोलनावेळी दबक्या आवाजात बोलत होते.

### 12.37 कोटींची ग्रॅच्युईटी थकित

**कर्मचाऱ्यांना पगार न देता त्यांनी एनटीसी सोडून जावे, अशी स्थिती सरकार व प्रशासन निर्माण करीत आहे. मात्र, सोडून गेलेल्या कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युईटीची रक्कमदेखील दिली जात नाही. त्याची थकबाकी १२.३७ कोटी रुपये असल्याचे नितनवरे यांनी सांगितले. तसेच कर्मचाऱ्यांना नियमानुसार असलेला वैद्यकीय खर्चदेखील दिला जात नाही.**

# शिरूर लोकसभेसाठी रस्सीखेच; खासदार अमोल कोल्हेंनी पहिल्यांदाच मांडली भूमिका

। शिरूर । महाईन्यूज



शिरूर मतदार संघावरून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये रस्सीखेच सुरू असताना विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांनी त्यांची भूमिका मांडली. अमोल कोल्हे म्हणाले, शिरूर मतदारसंघातील संभाव्य लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारीविषयी तर्क वितर्क लढवले जात आहे. मला अनेकजण विचारणा करत आहेत, माध्यमांवर यावर वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. परंतु यासंदर्भात मी प्रामाणिकपणे सांगू इच्छितो की, २०१९ साली पवार साहेबांच्या आशीर्वादाने आणि शिरूरमधील मतदारांच्या पाठिंब्यावर लोकसभेत मी प्रतिनिधीत्त्व करत असताना मतदारसंघात कामी केली. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि अजित पवार यांचे निकटवर्तीय म्हणून ओळखले जाणारे भोसरीचे माजी आमदार विलास लांडे यांचे शिरूर लोकसभा मतदारसंघात भावी खासदार म्हणून बॅनर लागले आहेत. माजी आमदार विलास लांडे यांचा आज वाढदिवस असून त्यानिमित्ताने त्यांच्या कार्यकर्त्यांनी भावी खासदार असा उल्लेख करत विलास लांडे यांचे बॅनर भोसरीमध्ये लावले आहेत. २०१९ मध्ये शिरूर लोकसभेसाठी विलास लांडे इच्छुक होते. परंतु, ऐनवेळी शिवसेनेतून राष्ट्रवादीत आलेले सध्याचे विद्यमान खासदार अमोल कोल्हे यांना राष्ट्रवादीकडून उमेदवारी मिळाली होती. अमोल कोल्हे म्हणाले, या मतदार संघात तीन महत्त्वाचे मुद्दे होते. पहिला मुद्दा म्हणजे पुणे-नाशिक महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी. यावर उपाय म्हणून पाच बायपास रोड मंजूर होऊन सुरू झाले आहेत. दुसरा मुद्दा म्हणजे मुळशी ते चांडोली एलिव्हेटेड कॉरीडोरमुळे चाकण चौकातली वाहतूक कोंडीपासून सुटका मिळणार आहे. हा प्रकल्प ऑक्टोबर २०२३ मध्ये सुरू होईल. आपण बैलगाडा शर्यतीचा मुद्दादेखील सोडवला.

# आषाढी वारीला जाणाऱ्या वारकऱ्यांना टोलमाफी

## पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा निर्णय

। मुंबई । महाईन्यूज

**पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी वारकऱ्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणींना सामोरे जायला लागू नये म्हणून चोख नियोजन करण्याचे आदेश गुरुवारी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी दिले. वारीसाठी येणाऱ्या वाहनांना परतीच्या प्रवासासह टोलमाफी देण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी या वेळी केली. पंढरपूर आषाढी वारीसाठी निधीची कोणतीही कमतरता पडणार नाही, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.**

या बैठकीस महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण आदी उपस्थित होते. पंढरपूर आषाढी वारीसाठी अर्थसंकल्पात जाहीर केल्याप्रमाणे नगरपालिकेसाठीच्या निधीत पाचवरून दहा कोटींची आणि ग्रामपंचायतींकरिता पंचवीसवरून पन्नास लाख रुपयांची अशी दुप्पट तरतूद केली आहे. याशिवाय रस्त्यांसाठीही वेगळा निधी दिला आहे. त्यामुळे रस्त्यांची परिस्थिती सुधारण्याबाबत काळजी घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी दिले. वारीच्या मार्गावरील पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना देण्यात येणारा निधी दुप्पट केला असून, तो तत्काळ वितरित करण्याची सूचनाही मुख्यमंत्र्यांनी केली. पंढरपूर आणि परिसरातील रस्ते वारीसाठी सुस्थितीत व्हावेत, यासाठी १० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. या निधीतून होणारी कामे वेळेत आणि दर्जेदार व्हावीत, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. यंदा वारीसाठी गर्दी होण्याची शक्यता आहे. वारी मार्गावर पाण्याच्या उपलब्धतेबाबत विशेष नियोजन करावे लागेल. कोणत्याही परिस्थितीत मनुष्यबळ, यंत्रसामुग्रीची कमतरता भासणार नाही, असे चोख नियोजन करण्याची सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली आहे. वारी मार्गावर ठिकठिकाणी वारकऱ्यांसाठी चांगल्या पद्धतीचे तंबू-निवारे उभे राहतील, पंखे आणि सावली याकरिता काळजी घ्यावी, वैद्यकीय पथके त्यातील तज्ज्ञ आणि रुग्णवाहिका यांचीही सज्जता ठेवावी, औषधे, पिण्याचे पाणी, अन्य आरोग्यसुविधा याबाबत वेळीच नियोजन करावे आदी सूचना यावेळी मुख्यमंत्र्यांनी केल्या. वारीत सहभागी होणाऱ्या वाहनांना टोल द्यावा लागू नये, यासाठी पोलिस विभागाने स्टिकर किंवा पासच्या माध्यमतून कार्यवाही करावी.

टोल नाक्यांवर विशेष व्यवस्था करून, वारकऱ्यांना टोल द्यावा लागू नये असे नियोजन करावे, पालखी मार्गावरील टोल नाके सुरू होणार नाहीत.



### जी-20चे प्रतिनिधी मंडळ अनुभवणार वारी

**जी-२० चे प्रतिनिधी मंडळ आषाढी वारीच्या काळात पुण्यात येणार आहे. त्यांना पंढरपूरची वारी संस्कृतीची ओळख करून देण्यासाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे. या प्रतिनिधींना आपल्या संस्कृतीतील या वैशिष्ट्यपूर्ण अशा वारीचे दर्शन घडवा, त्यासाठी उत्तम नियोजन करा, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.**

# PREGNANCY नंतर पहिल्यांदाच बोलली अनुष्का शर्मा

'झिरो' या २०१८ मध्ये आलेल्या चित्रपटात अभिनेत्री अनुष्का शर्मानं विशेष मुलीची भूमिका साकारली. त्यानंतर शाहरुखनं चित्रपटांतून ब्रेक घेतला, तसा अनुष्का शर्मानंही. मुलगी वामिकाच्या संगोपनासाठी वेळ देताना तिनं कामातूनही ब्रेक घेणं पसंत केलं. या काळात तिला भूमिकाही ऑफर झाल्या नसल्याची चर्चा झाली. मात्र, अनुष्कानं तेव्हा शांत राहणं पसंत केलं. अभिनेत्री म्हणून आपल्याला कधीच असुरक्षित वाटलं नाही, असं तिचं म्हणणं आहे. अनुष्का लवकरच महिला क्रिकेटपटू झूलन गोस्वामीवर होत असलेल्या 'चकदा एक्स्प्रेस' या चरित्रपटात दिसणार आहे. या चित्रपटाचं चित्रीकरण पूर्ण झालं आहे. अनुष्कानं यापूर्वी 'रब ने बना दी जोडी', 'ए दिल है मुश्किल', 'पीके', 'सुल्तान', 'जब हॅरी मेट सेजल', 'जब तक है जान', 'परी' या चित्रपटांत भूमिका साकारल्या आहेत.

तिनं 'पाताल लोक' ही सीरीज आणि 'कुडी नू नचने दे' या म्युझिक व्हिडिओतही काम केलं आहे. मध्यंतरी अनुष्कालाही बॉलिवूडमधल्या राजकारणाचा फटका बसल्याची चर्चा झाली. मात्र, त्यावर अनुष्कानं काहीही भाष्य केलेलं नाही. पती विराट कोहलीसोबत सोशल मीडियासह विविध कार्यक्रमांत सहभागी होऊन ती त्यांच्या नात्याबद्दल चाहत्यांशी मोकळेपणानं संवाद साधताना दिसते.

कान महोत्सवात सहभागी होऊन तिनं आगामी कलाकृतीचं प्रमोशन सुरू केलं आहे. तिला कसा प्रतिसाद मिळतो, हे लवकरच कळेल.



### करणचा व्हिडिओ चर्चेत


दरम्यान, अनुष्काचं करिअर सुरू होण्यापूर्वीच संपलं असतं, कारण करणनं तसे प्रयत्न देखील केले होते. याबद्दलचा एक व्हिडिओ काही दिवसांपूर्वी व्हायरल झाला होता. अनुष्कानं अभिनेत्री म्हणून 'रब ने बना दी जोडी' सिनेमातून अभिनयाच्या क्षेत्रात पदार्पण केलं होतं. आदित्य चोप्रानं या सिनेमात अनुष्काला घेऊ नये यासाठी प्रयत्न केल्याचं करणनं सांगितलं. करण या कार्यक्रमात म्हणाला की, 'मला अनुष्का शर्माचं करिअर खरंच उद्ध्वस्त करायचं होतं. कारण जेव्हा मला आदित्य चोप्राने तिचा फोटो दाखवला तेव्हाच मी तिला घेऊ नकोस असा सल्ला आदित्यला दिला होता. परंतु आदित्यनं माझा सल्ला न ऐकताच अनुष्कालाच सिनेमात घेतलं. खरं तर त्यावेळी अनुष्काच्या ऐवजी माझ्या डोक्यात वेगळ्याच अभिनेत्रीचं नाव होतं. त्यामुळं जेव्हा हा सिनेमा प्रदर्शित झाला तेव्हा मी फार रस न घेता तो पाहिला होता.'

# "खास चित्रपट, खास भूमिका अन्..." सिद्धार्थ

आपल्या दमदार अभिनयाच्या जोरावर मराठी चित्रपटसृष्टीच नाही तर बॉलिवूडमध्येही स्वतःचं वेगळं स्थान निर्माण करणारा अभिनेता म्हणजे सिद्धार्थ जाधव. काही दिवसांपूर्वीच त्याचा सर्कस हा चित्रपट प्रदर्शित झाला. या चित्रपटात तो रणवीर सिंगबरोबर काम करताना दिसला होता. या चित्रपटातील सिद्धार्थच्या अभिनयाचं कौतुक होताना दिसत आहे. दमदार अभिनयासाठी ओळखला जाणारा सिद्धार्थ जाधव सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असतो. नुकतीच त्याने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. जी बरीच चर्चेत आहे. सिद्धार्थ जाधवने त्याच्या इन्स्टाग्रामवर काही फोटो शेअर केले आहेत. हे फोटो कलादर्पण पुरस्काराचे आहेत.सिद्धार्थ जाधवने फोटो शेअर करताना लिहिलं, "खास चित्रपट, खास भूमिका आणि आता खास पुरस्कार कलादर्पण पुरस्कार २०२२. सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेता, धुरळा... मनापासून आभार!" आपल्या या पोस्टमध्ये त्याने दिग्दर्शक समीर विद्वांस यांना टॅग केलं आहे. तसेच चित्रपटाच्या संपूर्ण टीमचेही आभार मानले आहेत.

दरम्यान सिद्धार्थ जाधवच्या कामाबद्दल बोलायचं तर मराठी चित्रपटांनंतर सिद्धार्थने बॉलिवूड चित्रपटांमध्येही काही भूमिका साकारल्या आहेत. काही दिवसांपूर्वीच प्रदर्शित झालेल्या रोहित शेट्टीच्या 'सर्कस' चित्रपटात तो दिसला होता. याशिवाय मराठीतील 'बालभारती' हा त्याचा चित्रपट बराच चर्चेत होता. समीक्षकांच्या या चित्रपटाला चांगल्या प्रतिक्रिया मिळाल्या होत्या.





# नसीरुद्दीन शाह यांची केंद्रावर टीका

मुंबई : बॉलिवूडमधील दिग्गज अभिनेते नसीरुद्दीन शाह त्यांच्या उत्तम अभिनयासाठी ओळखले जातात. नसीर यांनी अनेक सिनेमांत उत्तम काम करत स्वतःचं असं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. अभिनयामुळे नसीरुद्दीन जसे चर्चेत असतात तसेच ते त्यांच्या बेधक विधानांमुळे देखील चर्चेत असतात. नसीरुद्दीन विविध सामाजिक, राजकीय विषयांवर त्यांची मते बेधडकपणे मांडत असतात. त्यांची मते अनेकदा वाद निर्माण करणारी असल्यानं त्यावरून त्यांच्यावर टीका देखील होते. परंतु टीकेकडे लक्ष न देता नसीर त्यांची मते निर्भिडपणे मांडत असतात. अलिकडेच नसीर यांनी देशातील मुस्लिमांबद्दल, त्यानंतर द केरल स्टोरी सिनेमाबद्दल त्यांची मते व्यक्त केली आहेत. आता पुन्हा एकदा नसीरुद्दीन यांनी संसदेच्या नवीन इमारतीच्या उद्घाटन सोहळ्यावर टीका केली आहे. सोहळा म्हणजे देशातील सर्वोच्च नेता त्याच्यासाठी स्मारक बनवत आहे, अशी बोचरी टीका त्यांनी केली आहे. संसदेची नवीन इमारत बांधणे योग्य असल्याचं मत त्यांनी व्यक्त केलं आहे. परंतु या उद्घानाच्या सोहळ्याचा जो कार्यक्रम झाला त्यावरून त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली आहे. संसदेच्या नवीन इमारतीचा उद्घाटना सोहळा झाला. त्यावर नसीरुद्दीन म्हणाले की, 'संसदेची जुनी इमारत शंभर वर्षे जुनी होती. त्यामुळे नवीन इमारत बांधण्याची गरज होती. परंतु त्यासाठी इतका मोठा उद्घाटन सोहळा करण्याची काय गरज होती?'

# मनोरंजन विश्वामध्ये मलायकाची चर्चा

'मनोरंजन विश्वामध्ये मलायकाची चर्चा होतच असते. वयाची पन्नाशी पार केल्यानंतरही तिच्या सौंदर्याची भुरळ तरुणांना पडते. इंस्टावर तर मलायकाच्या फोटोंना मिळणारा प्रतिसाद मोठा आहे. आता मलायका एका वेगळ्या कारणासाठी चर्चेत आली आहे.

मलायकाची सध्या मुव्हिंग इन विथ मलायका नावाची सीरिज नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे. वास्तविक ती मालिका आयएमडीबीच्या रेटिंगमध्ये पिछाडीवर असली तरी त्यामध्ये असलेल्या अनेक सेलिब्रेटींमुळे ती चर्चेचा विषय आहे. फराह खान, मलायकाची बहिण अमृता अरोरा याशिवाय करिना कपूर, नेहा धुपिया यांनी देखील मलायकाविषयी वेगवेगळ्या आठवणींना उजाळा दिला आहे. त्यात सीमा सजदेहाचा व्हिडिओ व्हायरल झाला आहे.



सीमा आणि सोहेल खानचा काही महिन्यांपूर्वी घटस्फोट झाला. त्या दरम्यान तिचा एका पार्टीमधील व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्यात सीमा मद्यपान करुन धुंद झाली होती. तिला तर कशाचीही शुद्ध राहिली नव्हती. अशातच पापाराझींनी तिला फोटोसाठी पोझ देण्यास सांगितले तर तिला ते ही जमेना. सोशल मीडियावर ते फोटोही व्हायरल झाले होते. त्यावरील प्रतिक्रियाही भन्नाट आहेत. मलायकानं त्यावर रोखठोकपणे भूमिका

# टीम इंडियाच्या युवा खेळाडूंनी पाकिस्तानला लोळवलं!

## आशिया कप हॉकी स्पर्धेत इतिहास रचला

। सालालाह ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयपीएल ज्युनिअर आशिया कप हॉकी स्पर्धेत भारतीय संघानं दमदार कामगिरी करत पाकिस्तानवर दणदणीत विजय मिळवला. अंतिम भारताच्या खेळाडूंनी पाकिस्तानला २-१ अशी धूळ चारली. ओमानमध्ये सालालाह येथे सुरु असलेल्या ज्युनिअर आशिया कप हॉकी स्पर्धेत भारतीय टीमनं दमदार खेळी करत विजेतेपदावर नाव कोरलं. आशिया कपच्या अंतिम फेरीत भारतीय हॉकी टीमची लढत पाकिस्तान बरोबर होती. काल झालेल्या सामन्यात भारतीय टीमनं पाकिस्तानचा २-१ असा पराभव करत विजय मिळवला.




या विजयासह टीम इंडियानं इतिहास रचला आहे. ज्युनिअर हॉकी इंडिया टीम सर्वाधिक वेळ आशियाई स्पर्धेतील विजेतपद पटकावणा संघ ठरला आहे. भारतीय टीमनं यामध्ये ही पाकिस्तानला मागं टाकलं आहे. पाकिस्तानच्या नावावर ३ विजेतेपद आहेत तर आता भारताच्या नावावर चार विजेतेपद आहेत.

भारतासाठी अंगद बीर सिंह यानं १२ व्या मिनिटाला गोल करत सामन्यात आघाडी मिळवून दिली. त्यानंतर अराइजीत सिंह हुंडल यानं १९ व्या मिनिटाला गोल केला. भारतानं या गोल सह निर्णायक आघाडी मिळवली होती. पाकिस्ताननं ३७ व्या मिनिटाला एक गोल केला. तो गोल पाकिस्तानच्या बशारत अली यानं केला. पाकिस्ताननं अखेरच्या काही मिनिटांमध्ये खूप आक्रमक खेळ केला. भारताच्या बचाव फळीनं दमदार कामगिरी करत पाकिस्तानचं आक्रमण थोपवलं.

### आठ वर्षानंतर स्पर्धा

तब्बल आठ वर्षानंतर ज्युनिअर आशिया कप स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं. यापूर्वी २०१५ मध्ये मलेशियामध्ये ही स्पर्धा खेळवण्यात आली होती. भारतीय संघानं यंदाच्या हंगामात दमदार खेळी केली. टीम इंडियानं सेमी फायनलमध्ये दक्षिण कोरियावर ९-१ असा दणदणीत विजय मिळवला होता. तर, पाकिस्ताननं मलेशियाचा ६-२ पराभूत केलं होतं.

### टीम इंडियाची दमदार कामगिरी

उत्तम सिंह च्या नेतृत्वातील भारतीय टीमनं या स्पर्धेत दमदार कामगिरी करत विजेतेपद पटाकवलं. ग्रुप स्टेजमध्ये भारतानं चारपैकी तीन सामन्यांमध्ये विजय मिळवला तर एक सामना अनिर्णित राहिला. भारताच्या ग्रुपमध्ये पाकिस्तान, थायलंड, जपान आणि चीनी ताईपे संघ होते. भारतानं ग्रुप मॅचमध्ये ३९ गोल केले. तर भारताविरोधात केवळ २ गोल करण्यात विरोधी संघांना यश आलं. संपूर्ण स्पर्धेत भारतानं ५० गोल केले तर विरोधी संघ भारताविरोधात या स्पर्धेत केवळ ४ गोल करु शकले.


# जागतिक कसोटी अजिंक्यपद अंतिम लढत

## पुजारा, कोहलीची ऑस्ट्रेलियाला धास्ती!

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

23 ऑस्ट्रेलियाविरुद्ध नेहमीच खेळ उंचावणारा चेतेश्वर पुजारा आणि पुन्हा सूर गवसलेला विराट कोहली या भारतीय फलंदाजांना रोखण्यात यश आले, तरच ऑस्ट्रेलियाला जागतिक कसोटी अजिंक्यपदाची (डब्ल्यूटीसी) अंतिम लढत जिंकणे शक्य होईल, असे मत ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार रिकी पॉन्टिंगने व्यक्त केले. पुजारा आणि कोहलीची ऑस्ट्रेलियाला धास्ती असेल, असे पॉन्टिंगला वाटते.





पुजारा गेल्या काही महिन्यांपासून इंग्लंडमधील कौंटी स्पर्धेत ससेक्स संघाकडून खेळत होता. त्यामुळे तो इंग्लंडमधील वातावरण आणि खेळपट्ट्या यांबाबत भारतीय संघातील सहकाऱ्यांना मोलाचा सल्ला देऊ शकेल. तसेच कोहलीला पुन्हा सूर गवसला असून त्याने यंदाच्या 'आयपीएल'मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुकडून खेळताना दोन शतके आणि सहा अर्धशतके साकारली.

"ऑस्ट्रेलियन संघ विराट आणि पुजारा यांच्याबाबत बरीच चर्चा करत असेल. या दोघांची ऑस्ट्रेलियन संघाला धास्ती असेल. ऑस्ट्रेलियाविरुद्ध विशेषत: ऑस्ट्रेलियात पुजाराने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. 'डब्ल्यूटीसी'चा अंतिम सामना ओव्हलच्या मैदानावर होणार असून तेथील खेळपट्टीही ऑस्ट्रेलियातील खेळपट्ट्यांप्रमाणेच असण्याची दाट शक्यता आहे.

# धोनीच्या गुडघ्याची सर्जरी यशस्वी

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

यंदाच्या आयपीएलमध्ये चेन्नई सुपर किंग्सने गुजरात टायटन्स संघाला पराभावाचा धक्का दिला. यासह सीएसके संघाच्या नावावर पाचवी आयपीएल ट्रॉफी झाली. एमएस धोनी याच्या नेतृत्वात सीएसकेने ५ ट्रॉफ्या आपल्या नावावर केल्या आहेत. यासह त्यांनी मुंबई इंडियन्स संघाचा कर्णधार रोहित शर्मा याच्या ५ वेळा ट्रॉफी जिंकण्याच्या विक्रमाचीही बरोबरी केली आहे. हा हंगाम धोनीसाठी खूपच खास राहिला आहे. त्याला प्रत्येक विरोधी संघाच्या मैदानावर चाहत्यांकडून भरभरून प्रेम मिळाले. मात्र, यादरम्यान तो गुडघ्याच्या दुखापतीने चिंताग्रस्तही दिसला. अशात आता धोनीबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. धोनीवर मुंबईला एका मोठ्या रुग्णालयात गुडघ्याची सर्जरी पार पडली आहे.



मुंबईतील कोकिलाबेन धीरूभाई अंबानी रुग्णालय आणि वैद्यकीय संशोधन संस्था येथे एमएस धोनी याच्यावर उपचार झाले आहेत. आज गुरुवारी प्रख्यात डॉ. दिनशॉ परडीवाला यांनी धोनीच्या गुडघ्याची सर्जरी केली. मिळालेल्या माहितीनुसार, धोनी बुधवारी मुंबईच्या कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल आणि मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये त्याच्या गुडघ्यावर उपचार घेण्यासाठी दाखल झाला होता. आज गुरुवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास त्याची यशस्वी सर्जरी झाली आहे.